**प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई आणि डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली**

# हवामानावर आधारीत कृषि सल्ला (रायगड जिल्हा)

**(०२३५८) २८२३८७**

**अंक ६२/२०१९** **दिनांक ०२/०८/२०१९** **कालावधी ५ दिवस**

**डॉ. प्रशांत बोडके,**
विभाग प्रमुख,
कृषिविदया विभाग
९४२०४१३२५५

**डॉ. विजय मोरे,**
नोडल ऑफिसर,
कृषिविदया विभाग
९४२२३७४००१

**डॉ. शितल यादव,**
तांत्रिक अधिकारी
कृषिविदया विभाग
८३७९९०११६०

| **मागील हवामान आठवडा सारांश (दिनांक २७/०८/२०१९ ते ०२/०८/२०१९)** | | | | | | | **हवामानाचे घटक** | **हवामान पूर्वानुमान (दिनांक ०३/०८/२०१९ सकाळी ८:३० पासून ०७/०८/२०१९ सकाळी ८:३० वाजेपर्यंत)** | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **२७/०७** | **२८/०७** | **२९/०७** | **३०/०७** | **३१/०७** | **०१/०८** | **०२/०८** | | **०३/०८** | **०४/०८** | **०५/०८** | **०६/०८** | **०७/०८** |
| २६५.६ | २७८.० | ४०.२ | १७७.० | ११८.८ | ३६.० | ९७.४ | **पाऊस (मिमी)** | ६२ | ८५ | १०२ | १०६ | ५० |
| २८.२ | २६.५ | २८.० | २७.० | २६.२ | २७.६ | - | **कमाल तापमान (अं.से)** | २९ | २८ | २८ | २९ | २९ |
| २२.८ | २३.५ | २३.५ | २३.६ | २२.६ | २३.८ | - | **किमान तापमान (अं.से)** | २५ | २४ | २५ | २५ | २५ |
| ८ | ८ | ८ | ८ | ८ | ८ | - | **मेघाच्छादन (ऑक्टा)** | ८ | ८ | ८ | ८ | ८ |
| ९३ | ९६ | ९५ | ८८ | ९२ | ९० | - | **सकाळची सापेक्ष आर्द्रता** | ९२ | ९३ | ९४ | ९१ | ९१ |
| ९६ | ९३ | ९३ | ९५ | ९२ | ८३ | - | **दुपारची सापेक्ष आर्द्रता** | ८६ | ८८ | ९० | ८६ | ८५ |
| ५.९ | ६.१ | ४.६ | ४.१ | ४.४ | ५.१ | - | **वाऱ्याचा वेग (किमी/तास)** | २३ | २५ | २२ | २२ | २३ |
| इ. | इ. | उ. | इ. | शांत | इ. | - | **वाऱ्याची दिशा** | नै.द. | द. | नै.द. | नै.प. | प. |
| | | | | | | **पाऊस (मिमी) १/१/२०१९ पासून आजपर्यंत** | | | | **पाऊस (मिमी) गेल्या वर्षीचा** | | |
| **१००६.०** | | | | | | **२५६०.०** | | | | **३५५८.३** | | |

## हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला

**दिनांक ३ ते ७ ऑगस्ट, २०१९ पर्यंत मुसळधार पाऊसाची शक्यता असून वाऱ्याचा वेगात वाढ संभवते.**

**दिनांक २ ते ८ ऑगस्ट, २०१९ साठी कोंकण विभागासाठी पर्जन्यमानाचा विस्तारित श्रेणी अंदाज हा सामान्यपेक्षा जास्त राहील.**

| **पिक** | **अवस्था** | **कृषि सल्ला** |
|---|---|---|
| **भात** | **फुटवे अवस्था** | • पाउसाची उघडझाप व ढगाळ वातावरणामुळे पाणथळ भागात लावलेल्या भात पिकावर पाणी साठून राहिल्यामुळे निळे भुंगेरे व सुरळीतील अळीचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असल्याने पिकाचे सातत्याने निरीक्षण करून किडीच्या प्रादुर्भावाकडे लक्ष ठेवावे. खाचरातील पाणी जास्त काळ न साठवता २-३ दिवसांच्या अंतराने जुने पाणी बाहेर काढण्याची आणि नवीन पाणी खाचरात घेण्याची व्यवस्था करावी. पाण्याची पातळी ५ सें.मी. पर्यंत ठेवावी. निळे भुंगेरे या किडीचा प्रादुर्भाव दिसून आल्यास नियंत्रणासाठी क्विनोलफॉस २५ टक्के प्रवाही ४० मि.ली. किंवा ट्रायझोफॉस ४० टक्के प्रवाही १२.५ मि.ली. किंवा लॅम्बडा सायहॅलोथ्रीन ५ टक्के प्रवाही मि.ली. प्रति १० लिटर पाण्यातून फवारावे तसेच सुरळीतील अळीचा प्रादुर्भाव दिसून आल्यास किडीच्या नियंत्रणासाठी शेतात पाणी बांधून पिकावरून एक जाड दोर आडवा धरून ओढत न्यावा त्यामुळे सुरळ्या पाण्यात पडतील. नंतर एक ते दोन तासांनी शेतातील पाणी एका बाजूला फोडून लावावे व सर्व सुरळ्या एका ठिकाणी जमा झाल्यावर नष्ट कराव्यात व त्यानंतर शेतात नवीन पाण्याची साठवण करण्याची व्यवस्था करावी.<br>__टिप:__ पाऊसामध्ये कीटकनाशकाचे द्रावण पानांवरून वाहून जावू नये म्हणून स्टिकर द्रावणात मिसळून फवारणी करावी.<br>• पुढील पाचही दिवस मुसळधार पाऊसाची शक्यता असल्याने भात खाचरातील अतिरिक्त पाणी बाहेर काढून टाकावे.<br>• भात पिक फुटवे येण्याच्या अवस्थेत देण्यात येणारा नत्र खताचा दुसरा हप्ता (हेक्टरी ८७ किलो युरिया) देण्याची वेळ ह्या आठवडयात येत असल्यास पुढे ढकलावा व पाऊसाची तीव्रता कमी झाल्यावर खते देण्यात यावी. |
| **आंबा** | **वाढीची अवस्था** | • पुढील पाचही दिवस मुसळधार पाऊसाची शक्यता असल्याने आंबा बागेत करण्यात येणारी पॅक्लोब्युट्राझोलची (कल्टार) आळवणी पुढे ढकलावी. |
| **नवीन फळबाग** | **वाढीची अवस्था** | • पुढील पाचही दिवस मुसळधार पाऊसाची शक्यता असल्याने नवीन लागवड केलेल्या फळबागेतील अतिरिक्त पाणी बाहेर काढून टाकावे.<br>• पुढील पाचही दिवस वाऱ्याच्या वेगामध्ये वाढ संभवत असल्याने नवीन लागवड केलेल्या कलमांना काठीचा आधार दयावा. |
| **नारळ व सुपारी** | - | • पुढील पाचही दिवस मुसळधार पाऊसाची शक्यता असल्याने नारळ आणि सुपारी बागेतील अतिरिक्त पाणी बाहेर काढून टाकावे. |
| **भाजीपाला पिके** | **वाढीची अवस्था** | • पुढील पाचही दिवस मुसळधार पाऊसाची शक्यता असल्याने भाजीपाला क्षेत्रातील अतिरिक्त पाणी बाहेर काढून टाकावे.<br>• पुढील पाचही दिवस वाऱ्याचा वेग जास्त असल्याने भेंडी, वांगी, टोमेटो, मिरची इ. पिकांना भर दयावी आणि काठीचा आधार द्यावा.<br>• वेलवर्गीय भाजीपाला पिकामध्ये फुले येण्यास सुरुवात झाली असल्यास फळमाशीच्या नियंत्रणासाठी 'मिथाईल युजेनोल' किंवा 'क्यु-लुअर' रक्षक सापळे भाजीपाला क्षेत्रामध्ये जमिनीपासून १ ते २ फूट उंचीवर प्रति हेक्टरी ४ लावावेत. |
| **दुभती जनावरे/ शेळ्या/** | **-** | • जनावरांना पिण्यासाठी स्वच्छ पाण्याची व्यवस्था करावी तसेच जनावरांचे येणाऱ्या पाऊसापासून संरक्षण करावे. |

**सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीवरून तयार करून प्रसारित करण्यात आली.**
**अधिक माहितीसाठी नजीकच्या कृषी विद्यापीठाचे केंद्र किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क करावा**